अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती.

# NOTICE

नोटीस क्र. –464 दि. १२/१२/२०२४

## वरिष्ठ महाविद्यालयातील बी.एस्सी.(संगणकशास्त्र) विद्यार्थ्यांनी राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षणशुल्क योजनेचे (ई.बी.सी.) महाडीबीटीवर शिष्यवृत्ती फॉर्म भरणेसाठी अत्यंत महत्वाची सूचना

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील प्रथम, व्दितीय व तृतिय वर्षातील बी.एस्सी (संगणकशास्त्र) या कोर्समधील खुल्या/ओपन कॅटेगरीतील सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, बी.एस्सी (संगणकशास्त्र) हा कोर्स महाडीबीटी पोर्टलवर मॅपिंग झालेला असून संबधित विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून महाडीबीटी पोर्टलवर शिष्यवृत्ती (फ्रिशिप) फॉर्म भरता येतील असे मा. शिक्षण सहसंचालक यांचेकडून महाविद्यालयास सूचना प्राप्त झालेली आहे. तरी, संबधित सर्व विद्यार्थ्यांनी आवश्यक ती मूळ ओरिजनल कागदपत्रे स्कॅन करुन खालील वेबसाईटवर ऑनलाईन फॉर्म भरावेत. शिष्यवृत्ती फॉर्म भरण्याची अंतिम मुदत दि. ३१/१२/२०२४ पर्यंत आहे.

**Website- www.mahadbt.maharashtra.gov.in**

### ऑनलाईन फॉर्म भरणेसाठी मार्गदर्शक सूचना खालीलप्रमाणे

१) विद्यार्थ्यांचा स्वतःच्या नावाचा शाळा सोडल्याच्या दाखल्याची झेरॉक्स प्रत जोडणे आवश्यक आहे.

२) सन २०२३-२४ मधील मा.तहसिलदार यांचा विद्यार्थ्यांच्या वडीलांचे नावे असलेला उत्पन्नाचा दाखला जोडावा. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क योजनेच्या (ई.बी.सी) विद्यार्थ्यांसाठी उत्पन्नाची मर्यादा रु.८,०००००/- (अक्षरी- आठ लाख रुपये) पर्यंत आहे.

३) वडील हयात नसतील तर आईचा उत्पन्नाचा दाखला व सोबत वडीलांच्या मृत्युच्या दाखल्याची झेरॉक्स जोडावी.

४) आधार कार्ड झेरॉक्स.

५) आधारकार्ड बँकखाते व मोबाईल नंबरशी संलग्न असणे आवश्यक आहे.

६) मागील वर्षाचे मार्कशिट झेरॉक्स व इयत्ता १० वीचे गुणपत्रक सर्वांनी जोडावे.

७) गॅप असेल तर गॅप ॲफिडेव्हिट आवश्यक.

८) डोमासाईल सर्टिफिकेट झेरॉक्स.

९) शाळा सोडल्याच्या दाखल्याची झेरॉक्स व पी.जी. साठी टी.सी. झेरॉक्स जोडावी.

१०) विद्यार्थ्यांचे स्वतःचे राष्ट्रीयकृत बँकेत खाते असलेले बँकपासबुक (आयएफएससी कोड व एमआयसीआर कोड नंबरचा पहिल्या पानावर शिक्का असणे आवश्यक आहे.)

११) रेशनकार्ड झेरॉक्स (पहिले पान व कुटूंबाचे नाव असलेले पान)

१२) शैक्षणिक वर्ष २०२४-२५ चे प्रवेश फी चलन झेरॉक्स

१३) महाडिबीटीवरील ऑनलाईन प्रतिज्ञापत्र अपलोड करावे.

१४) विद्यार्थ्यांनी ऑनलाईन फॉर्म भरताना करंट डिटेल्स या कॉलममध्ये फी पेड झिरो (शून्य) टाकणे अनिवार्य आहे अन्यथा रक्कम टाकल्यानंतर कॉलेजने दिलेली फी सवलतीची रक्कम विद्यार्थ्यांच्या बँक खात्यावर जमा होईल व विद्यार्थ्यास पुन्हा महाविद्यालयाकडे रक्कम भरावी लागेल याची काटेकोरपणे दक्षता घ्यावी.

१५) स्कॉलरशिप फॉर्म भरताना करंट डिटेल्स या कॉलममध्ये विद्यार्थ्यांचा प्रवेश ग्रॅन्ट मध्ये असेल तर **Aided** टाकावे व नॉनग्रॅटमध्ये प्रवेश असेल तर **UnAided** टाकावे. तसेच कॉलेजचे नाव बरोबर सिलेक्ट करावे.

१६) विद्यार्थ्यांना एकावेळी एकाच शिष्यवृत्ती योजनेचा फॉर्म भरावा. एखाद्या विद्यार्थ्याने कोणत्याही दोन योजनेचा फॉर्म भरल्यास एक योजना रिजेक्ट होत व यामध्ये कॅटेगरीतील विद्यार्थ्यांचे मोठया प्रमाणात आर्थिक नुकसान होते. यासाठी विद्यार्थ्यांन शक्यतो महाडीबीटी वरील पोस्ट मॅट्रीक स्कॉलरशिपचाच फॉर्म भरावा व एकाच योजनेसाठी अर्ज करावा.

१७) विद्यार्थ्यांनी स्कॉलरशिप/फ्रिशिपचे ऑनलाईन फॉर्म भरताना खाली दिल्याप्रमाणे महाविद्यालयाचे नाव निवडावे/ सिलेक्ट करावे.

## Senior College- Tuljaram Chaturchand College (0)

महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन फॉर्म भरल्यानंतर विद्यार्थ्यांनी फॉर्मची प्रिंट व वरील कागदपत्रे स्वतःजवळ ठेवावीत. विद्यार्थ्यांनी हार्ड कॉपी महाविद्यालयामध्ये जमा करण्याची गरज नाही. ज्या विद्यार्थ्यांचा प्रवेश हा फी सवलतीत झालेला आहे अशा विद्यार्थ्यांनी ऑनलाईन /फ्रिशिपचा फॉर्म भरला नाही तर संबंधित विद्यार्थ्यांच्या होणा-या आर्थिक नुकसानीस विद्यार्थी स्वतः जबाबदार राहील व महाविद्यालयाची उर्वरित फी भरावी लागेल, याची विद्यार्थ्यांनी गांभीर्याने नोंद घ्यावी.

रजिस्ट्रार

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

प्राचार्य